मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

***Re- ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 15th October, 2013.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.१-२०१३ -२०१४

अधिसभा
१५ ऑक्टोबर, २०१३

अधिसभेची सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षांत सभागृह) येथे शुक्रवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)

२. डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)

३. प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे

४. डॉ. मृदुल जगन्नाथ निळे

५. श्री. भुजंग किसनराव अहिरे

६. डॉ. दिलिप शंकरराव पाटील

७. प्राचार्या (श्रीमती) मंजुळा जेठानंद निचाणी

८. प्राचार्य गोरक्ष विठ्ठलराव पारगावकर

९. प्राचार्य नारायण मधुकर राजाध्यक्ष

१०. प्राचार्य मारोती तुळशिराम भगत

११. प्राचार्य मुरलीधर एस. कु-हाडे

१२. प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील

१३. प्राचार्या (श्रीमती) चैताली तापस चक्रवर्ती

१४. प्राचार्य (डॉ.) कृष्णा अप्पया पाटील

१५. प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे

१६. प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम्

१७. प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले

१८. प्राचार्या (श्रीमती) हर्षा कमलेश मेहता

१९. प्राचार्या (श्रीमती) प्रमिला श्रीकांत राऊत

२०. प्राचार्य (डॉ.) सिद्धेश्वर तुकाराम गडदे

२१. श्री. हसमुख देवजी रांभीया

२२. श्री. महेश काशिनाथ म्हात्रे

२३. श्री. वसंतरावजी गणेशमल ओस्वाल

२४. श्री. संजय बाबुराव शेटे

२५. श्री. भिकू रामजी इदाते

२६. डॉ. एम. ए. खान (सचिव)

२७. डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम

२८. डॉ. जालिंदर अडसुले

२९. डॉ. आद्याप्रसाद पांडये

३०. डॉ. शितलाप्रसाद अ. दुबे

३१. डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे

३२. डॉ. (श्रीमती) संगीता अतुल गोडबोले

३३. डॉ. बिंदूप्रकाश बेचन मिश्रा

३४. डॉ. संजय कुमार

३५. डॉ. (श्रीमती) अनुराधा संदीप मझुमदार

३६. डॉ. विवेक बळवंतराव देशमुख

३७. डॉ. अभय नामदेवराव बांबोले

३८. डॉ. (श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल

३९. डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार

४०. डॉ. दिपक गंगाधरराव बीडवई

४१. डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम

४२. डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद

४३. डॉ. (श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत

४४. डॉ. वसंत सिताराम शेकडे

४५. डॉ. विजय नामदेव पवार

४६. श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे

४७. श्री. महादेव बाबुराव जगताप

४८. श्री. प्रदीप बाळकृष्ण सांवत

४९. श्री. सुधाकर शंकर तांबोळी

५०. श्री. गणेश सदाशिव चव्हाण

५१. श्रीमती निलिमा नंदकुमार भुर्के

५२. श्री. संजय तुळशीराम वैराळ

५३. श्री. तुषार व्यंकटराव कुमारे

५४. श्री. शशिकांत काशिनाथ झोरे

५५. श्री. राजन वसंत कोळंबेकर

५६. प्राचार्य मुरलीधर गोविंदराव चांदेकर

५७. प्रा. अंबादास येलोजी मोहिते

५८. श्री. प्रकाश विठ्ठल पागे

५९. प्रा. (श्रीमती) रुपा शहा

६०. डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे

६१. डॉ. उदय साळुंखे

६२. डॉ. (श्रीमती) शुभदा अविनाश जोशी

६३. डॉ. कविता रामचंद्र लघाटे

६४. डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड

६५. डॉ. (श्रीमती) माधुरी किरण पेजावर

६६. डॉ. सुरेश किसनराव उकरंडे

६७. डॉ. टी. पी. मधू नायर

६८. श्री. दिलीप दगडू पवार

६९. डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले

७०. डॉ. गंगाधर आसाराम मेश्राम

७१. डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे

७२. डॉ. (श्रीमती) शेफाली रसेंद्रा पंडया

७३. डॉ. रामभाऊ महादू बडोदे

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

अधिसभेच्या नविन सदस्यांचे विद्यापीठातर्फे व अधिसभा सदस्यांतर्फे स्वागत करण्यात आले. मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २५(२)(ओ) अन्वये डॉ. एम. ए. खान व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २५(२)(एल) अन्वये प्राचार्य मतदारसंघ (सर्वसाधारण वर्ग) पदी डॉ. मुरलीधर एस. कु-हाडे तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २५(२)(पी) अन्वये

शिक्षक मतदारसंघ पदी (सर्वसाधारण वर्ग – कला शाखा) डॉ. शितलाप्रसाद दुबे यांची नेमणूक झाल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे अभिनंदन केले.

यानंतर अधिसभेने डॉ. (श्रीमती) एम.एस. मोलवणे, प्राचार्य रविंद्रन कर्थाडी, प्राचार्य विष्णू मगरे, प्राचार्य दिलीप बोरसे, व प्राचार्या (श्रीमती) ॲन्सी जोस या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

त्यानंतर कुलसचिवांनी अलिकडच्या काळातील मान्यवर व्यक्तींच्या दु:खद निधनाबदद्ल शोक व्यक्त करून पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली.

## ॲड. आर. जी. निंबाळकर

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील कायदेतज्ज्ञ व ज्येष्ठ नेते ॲड. आर. जी. निंबाळकर यांचे दिनांक ३ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

## श्री. रामप्रसाद गोएंका

वीजनिर्मितीपासून ते संगीतापर्यंत सर्व क्षेत्रांत औद्योगिक दबदबा निर्माण करणारे आरपीजी समूहाचे संस्थापक उद्योगपती श्री. रामप्रसाद तथा आर. पी. गोएंका यांचे दिनांक १४ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

## डॉ. वि. रा. करंदीकर

संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, पुणे विद्यापीठाच्या ज्ञानदेव अध्यासनाचे प्रथम प्राध्यापक आणि ज्येष्ठ लेखक डॉ. वि. रा. करंदिकर यांचे दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

## श्रीमती. शकुंतलादेवी

संगणकापेक्षाही वेगाने गणिताचे कोडे तोंडी सोडविण्यासाठी प्रसिध्द असलेल्या आणि त्यामुळेच 'मानवी संगणक' म्हणून ओळखल्या जाणा-या श्रीमती शकुंतलादेवी यांचे दिनांक २१ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.

## न्यायाधीश जे. एस. वर्मा

महिला अत्याचार विरोधी विधेयकासाठी महत्वपूर्ण शिफारसी करणा-या समितीचे अध्यक्ष, माजी सरन्यायाधीश जे. एस. वर्मा यांचे दिनांक २२ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

## श्रीमती. शमशाद बेगम

आपल्या अनोख्या आवाजात अजरामर केलेल्या व हिंदी चित्रपट संगीतावर आपला अवीट ठसा उमटवणा-या ज्येष्ठ गायिका श्रीमती शमशाद बेगम यांचे दिनांक २३ एप्रिल, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९४ वर्षांच्या होत्या.

## डॉ. सत्त्वशीला सामंत

ज्येष्ठ भाषाशास्त्रज्ञ डॉ. सत्त्वशीला सामंत यांचे दिनांक १ मे, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. सन १९६६ पासून त्यांनी राज्यशासनाच्या भाषा संचालनालयात प्रथम अनुवादक व नंतर सहायक संचालक म्हणून काम केले होते.

## श्रीमती शांता हरी निसळ

ज्येष्ठ संगीत समीक्षिका व 'उंबरठा' या चित्रपटाच्या कथालेखिका श्रीमती शांता हरी निसळ यांचे दिनांक ६ मे, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या.

## श्री. जगदीश माळी

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिध्द चेहऱ्यांना आपल्या कॅमे-याने नवे वलय मिळवून देणारे प्रसिध्द फोटोग्राफर श्री. जगदीश माळी यांचे दिनांक १३ मे, २०१३ रोजी निधन झाले.

## श्री. असगर अली इंजिनीअर

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुधारणावादी मुस्लिम विचारवंत, लेखक श्री. असगर अली इंजिनीअर यांचे दीर्घकाळाच्या आजाराने दिनांक १४ मे, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते.

## श्री. कृष्णलाल कोहली

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ.(श्रीमती) मधू सु. परांजपे यांचे वडील श्री. कृष्णलाल कोहली यांचे दीर्घकाळ आजाराने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

## डॉ. शर्मिला रेगे

पुणे विद्यापीठाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अभ्यास केंद्राच्या संचालिका आणि ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका डॉ. शर्मिला रेगे यांचे दिनांक १३ जुलै, २०१३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ४८ वर्षांच्या होत्या.

## श्रीमती माधवी देसाई

मराठीतील ज्येष्ठ लेखिका श्रीमती माधवी देसाई यांचे दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.

## डॉ. नरेंद्र दाभोळकर

अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे अध्यक्ष, सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे दिनांक २० ऑगस्ट, २०१३ रोजी पुण्यात निर्घृण हत्या करण्यात आली.

## श्री. जयंतराव साळगांवकर

कालनिर्णय दिनदर्शिका आणि पंचांगाचे संस्थापक, ज्योतिष आणि धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक, मराठी उद्योजक, व्यावसायिकांचे प्रमुख आधारस्तंभ ज्योतिर्भास्कर श्री. जयंतराव साळगांवकर यांचे दिनांक २० ऑगस्ट, २०१३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

## डॉ. एल. एच. हिरानंदानी

ख्यातनाम शल्यविशारद डॉ. एल. एच. हिरानंदानी यांचे दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९६ वर्षांचे होते. सन १९७२ साली त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

## श्रीमती सुष्मिता बॅनर्जी

भारतीय लेखिका श्रीमती सुष्मिता बॅनर्जी यांची अफगाणिस्तानातील त्यांच्या राहत्या घराबाहेर तालिबान्यांनी गोळया झाडून हत्या केली.

## गुरू सत्यनारायण गोएंका

भारतातील विपश्यनेच्या आधुनिक अवताराचे प्रणेते गुरू सत्यनारायण गोएंका यांचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते. गुरू सत्यनारायण गोएंका यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कारने गौरविले होते.

## प्रा. श्रीनिवास दिक्षित

तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक प्रा. श्रीनिवास दिक्षित यांचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते. एम. ए. परीक्षेत मुंबई विद्यापीठाचे तेलंग सुवर्णपदक मिळविणा-या प्रा. दिक्षीत यांनी तत्वज्ञानाचे अध्यापन करून अनेक विद्यार्थी घडविले.

## श्री. मोहन धारिया

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, माजी केंद्रीय मंत्री व नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मोहन धारिया यांचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१३ रोजी दिर्घकाळ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. श्री. मोहन धारिया यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कारने गौरविले होते.

## श्री. राजीव पाटील

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शक श्री. राजीव पाटील यांचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ रोजी ह्र्दयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी ते ४१ वर्षाचे होते. त्यांच्या 'जोगवा' या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. त्यांनी 'पांगिरा', '७२ मैल एक प्रवास' असे वेगळया धाटणीचे चित्रपट दिले. त्यांनी नुकतेच 'वंशवेल' हया चित्रपटाचे चित्रीकरण पुर्ण केले होते.

## श्री. हनुमंत एल. जाधव

श्री. हनुमंत एल. जाधव यांचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१३ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षांचे होते. त्यांनी विद्यापीठातील विविध विभागात काम करत उपकुलसचिव पदाचा पदभार संभाळला होता.

यानंतर अधिसभा सदस्यांनी वरील मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल एक मिनिट उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमप्रत्रिकेवरील बाब क्र. १ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

**बाब १: दिनांक २१ व २२ मार्च, २०१३ रोजी झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

सभेच्या प्रारंभी डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी सभेला सहसंचालकांची उपस्थिती गरजेची आहे अशी भावना व्यक्त केली. विद्यमान सहसंचालक सभेला उपस्थित राहू शकत नसल्यास संचालकांनी दुस-या सहसंचालकास उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत असे कळविण्यात आल्याची माहिती मा. कुलगुरूंनी सभागृहास दिली व सहसंचालकांच्या अनुपस्थितीस मंजूरी दिली.

श्री. सचिन रमेश तेंडूलकर यांना मुंबई विद्यापीठाने डी.लिट पदवी द्यावी असा ठराव श्री. दिलीप करंडे यांनी मांडला व त्यास श्री. संजय शेटे यांनी अनुमोदन दिले. त्याचप्रमाणे न्या. धर्माधिकारी यांना डी.लिट पदवी देण्यात यावी असा ठराव प्राचार्य (डॉ.) सिद्धेश्वर गडदे यांनी मांडला व त्यास प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव पाटील व प्राचार्या (श्रीमती) प्रमिला राऊत यांनी अनुमोदन दिले.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा मुंबई विद्यापीठाचे कुलपती मा. श्री. के. शंकरनारायणन यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करण्याचा ठराव श्रीमती निलीमा भुर्के यांनी मांडला. मा. कुलगुरूंसह सर्व सन्माननीय सदस्यांनी राज्यपालांना शुभेच्छा पाठविण्याचा ठराव एक मताने मान्य केला.

डॉ. दिपक बिडवई, प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे व डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी सुचविलेल्या सूचना, दुरूस्त्या आणि खुलाशाअंती इतिवृत्त मान्य करण्यात

आले. सदर इतिवृत्त संक्षिप्त व व्यवस्थितरित्या मांडल्याबद्दल अधिसभा सदस्य श्री. अंबादास मोहिते यांनी कार्यकारी प्राधिकरणे विभागातील कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

परीक्षा विभागातील महिला कर्मचा-यांना सहा वाजल्यानंतर परीक्षेच्या कामासाठी थांबावे लागते. प्रशासकीय अडचणी लक्षात घेऊन जर त्यांना थांबावे लागले तर त्यांची स्टेशनपासून घरापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करण्याबाबत तसेच मुंबई विद्यापीठातील महिला कर्मचा-यांबरोबरच विद्यापीठातील महिला सुरक्षा रक्षक, महाविद्यालयातील शिक्षिका व विद्यार्थीनी यांच्या सुरक्षितेबाबतचा मुद्दा श्री. दिलीप करंडे, प्राचार्य नारायण राजाध्यक्ष, श्री. संजय शेटे, श्री. सुधाकर तांबोळी व डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी मांडला. यावर प्र-कुलगुरूंनी परीक्षा भवनातील महिला कर्मचा-यांना साडे सहा वाजेपर्यंत सोडण्याबाबत परिपत्रक काढण्यात येईल असे आश्वासन दिले.

प्राध्यापकांच्या बहिष्कार काळात तृतीय वर्षे विज्ञान शाखेचे पेपर कमी अनुभवी आणि विद्यापीठाची मान्यता नसलेल्या प्राध्यापकांकडून तपासल्यामुळे तसेच ग्रेसींगचे निकष नेहमीपेक्षा वेगळे लावल्यामुळे विद्यापीठाचा दर्जा घसरला, विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. अध्यादेश क्रमांक ५०४ चा वापर करून निकाल पुन्हा जाहीर करावा अशी मागणी डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी केली. विनाअनुदानित महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमात साठ तासिका पूर्ण होत नसून याबाबत विद्यापीठाने जातीने लक्ष घालावे, क्रेडीट बेस पध्दतीमुळे तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अडीच तास आणि तृतीय वर्ष कला आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना २ तास असा फरक का?, क्रेडीट बेस पध्दतीमुळे परीक्षेची पध्दत बदलली गेली, परीक्षेचे वेळापत्रक वाढले, महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर मुल्यमापनाचा कालावधी वाढला, मुल्यमापनाच्या अधिकच्या वेळामुळे पुढील सत्राच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी असेलला वेळ अपुरा पडू लागला, त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यावर प्रंचड ताण येत आहे. आदि मुदद्यावर

झालेल्या चर्चेत डॉ. (श्रीमती) मधू परांजपे, डॉ. वसंत शेकडे, डॉ. विजय पवार, डॉ. (श्रीमती) संगिता गोडबोले, डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद आणि डॉ. दिपक बिडवई यांनी सहभाग घेत ६०/४० गुण पध्दती ऐवजी ८०/२० गुण पध्दतीचा अवलंब करावा अशी सूचना केली.

पंचेचाळीस दिवसात निकाल जाहीर का होत नाही? पुनर्मुल्यांकन करण्यासाठी विद्यार्थ्यांना फोटो कॉपीसाठी चार चार महिने थांबावे लागते. पुनर्मुल्यांकनाचे निकाल वेळेत न लागल्यामुळे विद्यार्थ्यांना दोन वेळा नाहक फी भरावी लागते. एकदा पुनर्मुल्यांकनाच्या वेळेस आणि दुस-यांदा परीक्षेच्या वेळेस. तसेच हॉलतिकीटाचा, सेंटरचा, पुनर्मुल्यांकनाचा गोंधळ नेहमीच का होतो? त्यामुळे विद्यापीठाची बदनामी होते याबाबत विद्यापीठाने गांभीर्याने विचार करायला हवा. एकाच दिवशी विद्यार्थ्यांचे दोन पेपर घेतल्यामुळे झालेला गोंधळ, हॉलतिकीटावर चुकीचे विषय छापल्यामुळे पाली विषयाच्या पेपरबाबत सोफया महाविद्यालयात निर्माण झालेला गोंधळ आदि झालेल्या चर्चेत श्री दिलीप करंडे, श्री प्रदिप सावंत श्री. सुधाकर तांबोळी, श्रीमती निलीमा भुर्के, श्री. संजय वैराळ, श्री. शशिकांत झोरे यांनी सहभाग घेत ८०/२० गुणपध्दतीचा विद्यापीठाने स्वीकार करावा अशी सूचना केली.

हॉलतिकीटात झालेल्या गोंधळाबाबत एम.के.सी.एल. ला जबाबदार धरत एम.के.सी. एल. सोबत झालेल्या कराराची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे की नाही, याबाबत प्रश्न निर्माण करून त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी मागणी श्री. प्रदिप सावंत आणि श्री. संजय वैराळ यांनी केली. तसेच थिअरी परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती खराब असल्यास किंवा तो आजारी असल्यास त्याला थिअरी पेपरला कमी गुण पडतील आणि अशा विद्यार्थ्यांचे इंटरनलचे मार्क देखील कमी केले जातील, म्हणून अशी चुकीची

पध्दत अवलंबू नये. अशी मागणी श्री. सुधाकर तांबोळी आणि श्री प्रदिप सावंत यांनी केली.

विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या समान वेतन श्रेणीतील विविध पदांसाठी झालेल्या परीक्षेत निर्माण झालेला गोंधळ, विद्यापीठ आणि महाविद्यालयात मागासवर्गीय प्राध्यापकांची पदे भरताना मागासवर्गीय प्राध्यापकांवर होणा-या अन्यायाबाबत विद्यापीठ प्रशासनाने जातीने लक्ष घालावे अशी सूचना श्री. संजय वैराळ यांनी केली.

ऑनलाईन पध्दतीने प्रश्नपत्रिका महाविद्यालयात पाठविणे ही बाब कौतुकाची आहे आणि काळाची गरजही आहे. परंतु महाविद्यालयांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका प्राप्त झाल्यानंतर छपाई करून त्याच्या प्रती तयार करून स्टेपल करण्यासाठी देण्यात येणारा वेळ एक तास पंधरा मिनीटां ऐवजी दिड ते पावणे दोन तासांचा करावा. तसेच विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणा-या परीक्षा शुल्कापैकी चाळीस टक्के फी महाविद्यालयांना दयावी. अशी सूचना श्री. वसंतरावजी ओस्वाल यांनी केली.

विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांनी क्रेडिट बेस सेमिस्टर पध्दतीचा स्विकार केलेला असून क्रेडिट बेस सेमिस्टर पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना कम्प्लसरी कोर्सेस आणि इलेक्टीव कोर्सेस उपलब्ध करून दिले आहेत. इलेक्टीव कोर्सेसमुळे विद्यार्थी वेगवेगळे विषय निवडत आहेत. आणि इलेक्टीव कोर्सेसमुळे परीक्षेचे वेळापत्रक दिर्घ होत असून परीक्षा पध्दतीवर त्याचा ताण येत आहे असा डॉ. प्रल्हाद जोगदंड, अधिष्ठता, कला शाखा यांनी खुलासा केला.

विज्ञान शाखेच्या तृतीयवर्ष सत्र पाच व सत्र सहा साठी परीक्षेचा कालावधी २ तासा ऐवजी २½ तास करण्याचा निर्णय आधी अभ्यास मंडळ व नंतर विद्वत परिषदेमध्ये घेण्यात आला होता. कोणाला परीक्षक नेमावे याबाबत लिखीत स्वरूपात कोणताही नियम

विद्यापीठात उपलब्ध नसून नियम करण्याची गरज आहे. तसेच ग्रेसींग बाबत कोणताही नियम/अधिनियम नसतानाही यावेळेस देखील ग्रेसींग दिली गेली आहे. या मुद्द्यांचा खुलासा डॉ. (श्रीमती) माधवी पेजावर, अधिष्ठाता, विज्ञान शाखा यांनी केला.

ग्रेसींगबाबत नियम/अधिनियम/अध्यादेश असो किंवा नसो परंतु परिस्थिती किंवा वस्तुस्थिती लक्षात घेऊन शिक्षकांना, मॉडरेटर आणि विषयाचे चेअरमन यांना विश्वासात घेऊन ग्रेसींग दिली गेली पाहिजे असे मत प्राचार्य मुरलीधर कु-हाडे यांनी मांडले.

**डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला. सदर स्थगन प्रस्तावास डॉ.वसंत शेकडे यांनी अनुमोदन दिले.**

> **"That this meeting of the Senate be adjourned for ten minutes to express concern at administrative breakdown, high-handedness, lack of transparency and diminishing academic perspective in certain sections of the University and some of its affiliated colleges, jeopardizing students' careers as well as academic advancement of teachers, leading to alienation among the teaching community with disastrous consequences for the research activity in the University".**

डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी उपरोक्त स्थगन प्रस्ताव मांडत क्रेडिट बेस पध्दतीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा भवनातील कामकाज पूर्णपणे कोलमडले असून, क्रेडिट बेस पध्दतीमुळे प्राध्यापकांना शिकवणे ही एक अत्यंत डोकेदुखी झालेली आहे. शिकवण्या व्यतिरीक्त शिक्षकांना कलेक्शन ऑफ असाइंमेंट, विद्यार्थ्यांचा फॉलोअप घेणे, मार्कलीस्ट तयार करणे अशा प्रकारच्या इतर कामामुळे शिकविण्यासाठी कमी वेळ मिळत आहे. विद्यार्थ्यांचा लेक्चरला बसण्याऐवजी ग्रंथायलयात बसून असाइंमेंट पूर्ण करण्यात वेळ जात आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार प्राध्यापकांनी महाविद्यालयात आठवडयाचे ४० तास थांबण्याबाबत सूचना असतानाही युजीसीच्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ काढत महाविद्यालयातील प्राचार्य युजीसीच्या परिपत्रकाचे उदाहरण देत, प्राध्यापकांना प्रत्येक दिवशी सहा तास चाळीस मिनिटे महाविद्यालयात उपस्थित राहाण्यास सक्तीचे करत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या याबाबत काढलेल्या १९७५ सालच्या परिपत्रकानुसार प्राध्यापकांनी आठवडयाला ४० तासांपैकी २० तास महाविद्यालयात उपस्थित रहावे व बाकीचे २० तास संशोधन कार्य आणि शिकवणीच्या तयारीसाठी खर्च करावेत. असे असतानाही प्राध्यापकांना प्राचार्यांकडून त्रास होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या १९७५ सालच्या परिपत्रकानंतर कोणतेही परिपत्रक निर्गमित झालेले नाही. त्याचप्रमाणे आरआरसीच्या कामकाजात पारदर्शकता नसल्याबदद्ल आरआरसीच्या गाईडच्या यादीत कमी अनुभवी प्राध्यापकांचा समावेश, लांजा महाविद्यालयातील प्राचार्यांकडून प्राध्यापकांना होणारा त्रास, नेने महाविद्यालयातील भूगोल विषयाच्या प्राध्यपकांच्या प्रलंबित मागण्या, विल्सन महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून प्राध्यापकांना होणारा त्रास, महात्मा गांधी मिशन महाविद्यालयातील प्राध्यापकांचे सात पानी रिपोर्ट विद्यापीठात जाणीवपूर्वक प्राचार्यांकडून पाठविले जात नसल्याबाबत, सन २००९ पूर्वी एम.फील. पूर्ण केलेल्या प्राध्यापकांना नेट/सेट मधून सूट न मिळण्याबाबत, तक्रार निवारण समितीने घेतलेले निर्णय व्यवस्थापन परिषदेने मंजूर केल्यानंतरही प्राध्यापकांना न्याय मिळत नाही, ए.पी.आय. आणि कॅसबाबतच्या स्क्रुटीनी फॉर्मवर आम्ही सही करणार नाही अशी प्राचार्यांकडून अडवणूक केली जात असल्याबदद्ल, अभियांत्रिकी शाखेत प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचा अभाव, परीपूर्ण प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकाच्या अभावामुळे क्रेडीट सिस्टमनुसार घेतलेल्या परीक्षा यांवर निर्माण झालेले प्रश्न असे गंभीर मुदद्े उपस्थित करत डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी स्पष्ट शब्दात विद्यापीठात शैक्षणिक वातावरण गढूळ झाले असल्याचा आरोप केला. सदर मुदद्यावर झालेल्या चर्चेत डॉ. वसंत शेकडे, डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. विवेक देशमुख, डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल, डॉ. दिपक बिडवई आणि श्री. हसमुख रांभिया यांनी सहभाग घेतला.

विधी शाखेतील शिक्षणाबाबत चिंता व्यक्त करीत डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल म्हणाल्या की, विधी महाविद्यालयांची परीस्थिती दयनिय झालेली असून अनुदानित किंवा विनाअनुदानित जवळपास ३० महाविद्यालयांपैकी फक्त ३ ते ४ महाविद्यालयात कायमस्वरूपी प्राचार्य नियुक्त केलेले आहेत परंतु इतर महाविद्यालयात कायमस्वरूपी प्राचार्य तर नाहीत पण शिक्षक देखील पूर्ण संख्येत नाहीत. अशामुळे विधी शाखेतील शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. सर्व महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असून विद्यापीठातर्फे याबाबत जातीने लक्ष घातले पाहिजे आणि यासाठी एक समिती गठीत करून योग्य निर्णय घेतला पाहिजे.

जे काही थोडया प्रमाणात विधी शाखेत प्राध्यापक आहेत ते प्राचार्य होण्यास तयार नाहीत. मागासवर्गीय खासकरून अनुसूचीत जमाती/विमुक्त व भटक्या जमाती या प्रवर्गातील उमेदवार मिळत नाहीत आणि जे कोणी मुंबई बाहेरून उमेदवार मिळतात त्यांना मुंबईमध्ये राहणे परवडत नाही. अशा अनेक अडचणी विधी शाखेतील प्राचार्य व प्राध्यापकांची पदे भरताना येतात. जे काही विधी महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवायचे आहे, जी काही महाविद्यालयांची पडताळणी करायची आहे ती केली पाहीजे पंरतु महाविद्यालयांच्या अडचणी काय आहेत. हे देखिल लक्षात घेतले पाहिजे अशी सूचना प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी केली.

लांजा महाविद्यालयात तक्रार निवारण समिती असून त्या समितीकडे अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे प्राध्यापकांवर अन्याय होत असल्याची बाब प्राचार्य सुधीर भोसले यांनी खोडून काढली.

पीएच.डी. संदर्भात पेटची परीक्षा वर्षातून दोन वेळा घ्यायची असते ती होत नाही, परीक्षा झाल्यानंतर तीन वर्षानंतर सुध्दा त्यांना गाईड मिळत नाही, पेट परीक्षेचा निकाल तीन वर्ष ग्राहय धरला जावा, पीएच.डी. केंद्रांकडून असमान घेण्यात येणारी फी, प्रत्येक

गाईडकडे किती विद्यार्थी असावेत याबाबत असलेले मतभेद, पेपर तपासण्याचे केंद्र विभागल्याने पेपर तपासतांना असेसमेंट/मॉडरेशन यांच्या नियमात कोऑर्डिनेशन किंवा युनिफॉर्मिटी होत नसल्याबद्दल, क्रेडीट सिस्टीम पध्दतीमुळे परीक्षा वाढल्या तसेच ब-याचशा परीक्षा विद्यापीठाने महाविद्यालयांवर सोपविल्यामुळे महाविद्यालयांवर पडलेला अतिरीक्त भार यांच्या तुलनेत कमी शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, विधी शाखेस डीन नसल्याबद्दल तसेच विधी महाविद्यालयांना बार कौन्सिलची मान्यता नसल्याबद्दल, आदि मुद्दयावर झालेल्या चर्चेत श्री महादेव जगताप, डॉ. प्रल्हाद पवार, श्री गणेश चव्हाण यांनी सहभाग घेतला.

क्रेडीट बेस गुण पध्दती ही विद्यापीठाच्या प्राधिकरणांनी सर्वानुमते स्विकारली असून क्रेडीट बेस गुणपध्दतीचे तीसरे वर्ष आहे. या अभ्यासक्रमातील पहीली तुकडी या वर्षी पूर्ण होत असून ७५/२५ किंवा ८०/२० या गुणपध्दतीचा आपण नंतर विचार करूया. विद्यापीठाच्या मागील १५ वर्षात पहिल्यांदा तृतीय वर्ष वाणिज्यचा निकाल ३९ दिवसात लागला. स्केलींग डॉऊन (Scaling Down) पध्दती ही भारतात व परदेशात ब-याच विद्यापीठांनी स्विकारली असून सुरळीत चालू आहे. प्रत्येक महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या एकूण असलेल्या विद्यार्थी संखे इतक्या विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका तपासण्याची जबाबदारी त्या प्राचार्याची असेल असा ठराव परीक्षा मंडळाने पारीत केल्याची माहिती डॉ. टी.पी. नायर यांनी दिली.

या चर्चेस उत्तर देताना क्रेडीट सिस्टीमवर रिव्हीव्यू समितीमध्ये चर्चा करण्यात येईल तसेच बोर्ड ऑफ एक्झामिनेशन व अंतिमत: विद्वत परिषदेत यावर निर्णय घेण्यात येईल व पीएच.डी. गाईड बाबत नियमावलीचा आढावा घेऊन सुधारीत नियमावली तयार करू असे आश्वासन प्र-कुलगुरूंनी दिले.

विल्सन, नेने, लांजा आणि एम.जी.एम. महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या तक्रारीबाबत प्राचार्य आणि महाविद्यालयांच्या संस्थाकडून अहवाल मागविण्यात येईल व आवश्यकता

भासल्यास चौकशी समिती गठीत करण्यात येईल व समितीच्या अहवालानुसार प्रशासन निर्णय घेण्यात येईल, असे मा. कुलगुरूंनी आश्वासन दिले. पीएच.डी. मार्गदर्शकांबाबत निर्णय आर.आर.सी. मध्ये घेतले जातात, प्रशासनाचा तो अधिकार नाही असे स्पष्ट करून मा. कुलगुरूंनी या संदर्भात काही तक्रारी असल्यास त्याबाबत आर.आर.सी. व बी.यु.टी. आर. ला आढावा घेण्याबाबत कळविण्यात येईल, विधी शाखेमध्ये कशाप्रकारे बदल करता येतील याविषयी निश्चितपणे विचार करून निर्णय घेऊ. सर्व महाविद्यालयांनी युजीसीच्या गाईडलाईन व महाराष्ट्र शासनाचे नोटिफिकेशन यांचे पालन करावयास हवे असे मा. कुलगुरू म्हणाले.

**माननीय कुलगुरूंच्या विनंती नंतर डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.**

**श्री. दिलीप करंडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला. सदर स्थगन प्रस्तावास श्री. महादेव जगताप यांनी अनुमोदन दिले.**

> **"मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागात प्रंचड गोंधळ माजलेला असून परीक्षेचे निकाल, हॉल तिकीटाचा गोंधळ, मार्कशीटस् तसेच पुनर्मुल्यांकन यांचा निकाल लागल्यानंतर तीन तीन महीने मार्कशिटस् मिळत नाहीत. कित्येक परीक्षा सुरू झाल्या आहेत तरी त्यांचे पुनर्मुल्यांकनाचे निकाल अद्यापपर्यंत लागलेले नाहीत. विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होत असून त्यांच्या करीयरला धोका निर्माण झाला आहे, हा विषय अंत्यत गंभीर असून या विषयावर सदर सभा स्थगित करावी."**

परीक्षा विभागाच्या इमारतीची दयनिय अवस्था, अस्ताव्यस्त पसरलेले पेपर, भिंतीवरील लोंबकळणा-या इलेक्ट्रीक वायर, शॉटसर्कीटमुळे लागलेली आग या सर्व बाबींमुळे परीक्षा विभाग, तेथील कर्मचारी वर्गावर आणि परीक्षेवर होणारा परीणाम लक्षात घेता, परीक्षा विभागातील सुधारणांसाठी तात्काळ ४० लाख रूपये मंजूर करावे असा

प्रस्ताव श्री. दिलीप करंडे यांनी मांडला. परीक्षा विभागातील कामाचे ऑडीट करणे गरजेचे असून परीक्षा विभागात कायम स्वरूपी कर्मचा-यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे जेणेकरून परीक्षा विभागात गैरकारभार झाल्यास जबाबदारी निश्चित करता येईल. वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अनधिकृत बांधलेल्या मजल्यांबाबत चौकशी करण्यात यावी. पुनर्मुल्यांकनाचे पेपर वेळेत तपासले का जात नाहीत? प्रमाणपत्र तपासणीसाठी लागणारा वेळ व त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान आदि मुद्दे श्री. दिलीप करंडे यांनी उपस्थित केले. सदर मुद्दयांवर झालेल्या चर्चेत श्री. प्रदिप सावंत आणि श्रीमती निलिमा भुर्के यांनी सहभाग घेतला.

दिनांक २९ ऑगस्ट, २०१३ रोजी बॅचलर ऑफ अंकाऊटींग ॲन्ड फायनान्स या विषयाच्या परीक्षेत चुकीच्या प्रश्नामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागला, जर विद्यार्थ्यांनी प्रश्न सोडविला असेल तर आम्ही १५ गुण देऊ असे विद्यापीठाने दिलेल्या आश्वासनाची विद्यार्थी अजूनही वाट पाहत आहे अशी आठवण श्री. सुधाकर तांबोळी यांनी करून दिली. तसेच १५ दिवसातून एकदा पत्रकार परिषद बोलावून विद्यापीठाबद्ल येणा-या बातम्यांबाबतचा खुलासा वृत्तपत्रातून करावा. जेणेकरून विद्यार्थी, पालक, आणि प्राधिकरणांच्या सदस्यांना बातम्यांचा खुलासा कळेल. परीक्षेचे सेंटर, परीक्षांच्या तारखा महाविद्यालयांना वेळेत कळविल्या गेल्या पाहिजेत तसेच विद्यार्थ्यांनाही परीक्षेबाबतची माहिती त्यांच्या मोबाईलवर एस.एम.एस. च्या माध्यमातून उपलब्ध करून दिली पाहीजे, तसेच परीक्षा भवनातील गोपनीय विभागात अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त कोणाचीही उपस्थिती नसावी. अशी सूचना श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली. गोपनीय विभागात अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त कोणाचीही उपस्थिती राहणार नाही यांची काळजी घेण्यात येईल. असा खुलासा प्र-कुलगुरू यांनी केला.

क्रेडीट सिस्टममध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमास ए.टी.के.टी. च्या नियमांचा पुन्हा विचार करण्यात यावा तसेच एम.के.सी.एल. च्या आलेल्या वाईट अनुभवावरून विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षण संस्थेत प्रवेश देताना ऑफलाईनची परवानगी देण्यात यावी अशी मागणी श्री. राजन कोळंबेकर यांनी केली.

एम.एस्.सी. पार्ट-१ च्या चारशे विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालास उशीर होत आहे, विद्यापीठ दोषींवर कारवाई करणार का? सी.एच.एम. महाविद्यालयात विद्यार्थ्यांवर होणा-या अन्यायाबाबत स्थानिक चौकशी समिती पाठविण्यात यावी, पीएच.डी. केंद्रावर विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी अतिरिक्त फी व युजीसीच्या नियमांचे उल्लंघन, दूरस्थ शिक्षण संस्थेची पुर्वीची प्रवेशप्रक्रिया योग्य असून त्याप्रमाणे प्रवेश देण्यात यावेत. विद्यापीठास त्या प्रॉस्पेक्टस्च्या माध्यमातून प्रतीमागे विद्यार्थ्यांकडून रू.१००/- मिळतात, मराठी भाषेत पीएच. डी. करताना प्रस्ताव इंग्रजी भाषेत देण्याची सक्ती का करण्यात येते? आदी मुदद्े श्री. महादेव जगताप यांनी मांडले.

विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस रिक्रुटमेंट पध्दत सुरू केल्याबद्‌ल विद्यापीठाचे अभिनंदन केले. परंतु पुनर्मुल्यांकनात होणा-या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांना कॅम्पस रिक्रुटमेंटमध्ये मिळालेल्या चांगल्या नोकरीस मुकावे लागत असल्याबदद्‌लची माहिती श्री. गणेश चव्हाण यांनी दिली.

नेहमीच उशिरा होणा-या पुनर्मुल्यांकनाबाबत विद्यापीठ प्रशासनाने काहीतरी वेगळा विचार करून नवीन धोरण स्विकारून निकाल लवकर लागण्यासाठी काही तरी प्रयत्न करावा. अशी भावना डॉ. अभय बांबोले यांनी व्यक्त केली.

विद्यापीठातील वाढलेला व्याप लक्षात घेता विद्यापीठात अतिरिक्त कुलसचिव आणि अतिरिक्त परीक्षा नियंत्रकाची मागणी श्री. दिलीप करंडे यांनी केली. विद्यापीठात

अतिरिक्त कुलसचिव आणि अतिरिक्त परीक्षा नियंत्रकाची पदे निर्माण करण्याबाबत जे.बी. व्ही.सी.च्या बैठकीत निर्णय झालेला असल्याचा खुलासा प्र-कुलगुरूंनी केला.

वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाला शोकॉज नोटीस पाठविण्यात आलेली आहे. शोकॉजचे उत्तर पुढील बी.सी.यु.डी. मध्ये ठेवण्यात येईल असा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी खुलासा केला.

**श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला. सदर स्थगन प्रस्तावास श्री. महादेव जगताप यांनी अनुमोदन दिले.**

> **"दिनांक २/८/२०११ च्या विशेष भरती मोहीमेच्या महाराष्ट्र शासनाच्या G.R. ची पायमल्ली करून मागासवर्गियांचा अनुशेष न भरल्याबदल मुंबई विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाचा निषेध करण्याकरीता. तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा, G.R. ८/८/२००६ नुसार मुंबई विद्यापीठ व मुंबई विद्यापीठा अंतर्गत येणा-या सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना ई-सुविधा महाराष्ट्र ज्ञान महामंडळा मार्फत पूर्णपणे उपलब्ध न करून दिल्याबदल सभागृह पंधरा मिनिटे तहकूब करावे"**

महाराष्ट्र शासनाची सन २००८-२०११ मध्ये मागासवर्गीयांची पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिम राबवली जात असतानांही विद्यापीठाच्या प्रशासनाने विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील मागासवर्गीयांची पदे विशेष भरती मोहिमेअंतर्गत का भरली गेली नाहीत? तसेच विद्यापीठातील विभागात प्रवेश प्रक्रियेत मागासवर्गीयांना डावलले जाऊ नये म्हणून नियुक्त केलेल्या मॉनिटरींग समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही, अनु.जाती/अनु. जमाती च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या आर्थिक लाभांत वाढ करण्यात यावी व त्याचे नियोजन योग्यरित्या करण्यात यावे, स्पर्धा परीक्षेसाठी चालविण्यात येणा-या क्लासेस मध्ये सुधारणा करावी, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या सुविधांचा दर्जा वाढवावा, रेमिडीयल कोचिंग, रेमिडीयल क्लासेस आणि बुक बँक सुविधांचे नियोजन व्यवस्थित करावे व

विद्यापीठाने सुविधांचा आढावा घ्यावा अशा सूचना श्री. संजय वैराळ यांनी केल्या. तसेच प्राधिकरणे, परिपत्रक, शिष्यवृत्ती, पारीतोषिके, विद्यापीठाचे विविध कार्यक्रम इत्यादी बाबतची माहिती ई-सुविधांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी अशीही सूचना केली.

शारीरिक शिक्षण विभागात विद्यार्थ्यांना सरावासाठी साहित्य, गणवेश आणि इतर सुविधा मिळत नाहीत. त्याबाबत विद्यापीठ प्रशासनाने जातीने लक्ष घालावे असा मुद्दा श्री. प्रदीप सावंत यांनी मांडला.

विविध शाखेतील बरेचसे निकाल ४५ दिवसात लावण्यात आले आहेत. काही पुनर्मुल्यांकनाबाबत उशिर नक्कीच झालेला आहे. परंतु येत्या पंधरा दिवसात सर्व निकाल लावण्यात येतील. परीक्षा भवनाच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव मान्य झालेला आहे. एक वर्षाच्या आत सर्व आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी एक नवीन परीक्षा भवनाची इमारत तयार झालेली असेल. तसेच परीक्षा भवनातील विभागात असलेल्या रिक्त पदांवर कायम स्वरूपी कर्मचारी घेण्यात येतील. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना त्यात दिलेली माहिती जी महाविद्यालयांनी तपासून विद्यापीठाकडे पाठविण्यात आली तीच माहिती हॉल तिकिटावर छापण्यात आलेली आहे. वेळापत्रक तयार झाल्यानंतर वेबसाईटवर टाकण्यात येते आणि वेळापत्रकाबाबत कोणाच्या काही समस्या आहेत का अशी विचारणा करण्यात येते. परंतु त्याबाबत कोणाकडूनही सूचना आल्या नाहीत. विद्यापीठ नेहमीच विद्यार्थी हित लक्षात घेत आलेले आहे. विद्यापीठाकडे महाविद्यालयांकडून परीक्षेपूर्वी दोन तीन दिवसाआधी आलेले परीक्षेचे अर्ज स्विकारण्यात येतात. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी देखील दिली जाते. परंतु कमी काळात सिटींग अरेंजमेंटचा प्रश्न निर्माण होतो आणि थोडया अधिक प्रमाणात गोंधळ निर्माण होतो. त्यासाठी ठराविक मुदतीनंतर कुठलेही परीक्षेचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. प्रशासनाला असे एक नवीन वेळापत्रक दयायचे आहे, ज्यात परीक्षा घेण्यापासून थिअरी परीक्षा, प्रॅक्टीकल्सचे मार्क्स,

सबमिशन ऑफ इंनटरनल मार्क्स, पेपर कॅंप सेंटरला कुठल्या दिवशी जाणार, कॅप सेंटरमध्ये किती दिवस राहणार, स्कॅनिगला कधी जाणार, गुणपत्रिका कधी मिळणार अशा प्रकारचे कॅलेंडर सर्वांसमोर असेल व त्याप्रमाणे परीक्षांच्या निकालापासून ते पुनर्मुल्यांकनापर्यंत सर्व काही त्यात असेल परंतु, यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. तसेच परीक्षा भवनाच्या दुरूस्तीसाठी सप्लीमेंटरी बजेट फायनांस कमिटी पुढे ठेवून ती बाब व्यवस्थापन परिषदे पुढे ठेवण्यात येईल. फिजीकल एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांना टी-शर्ट, सॉक्स, ट्रॅकसूट, डेटा कार्ड, किट्स पुरविण्यात आले आहे आणि त्यांच्याशी संपर्क साधला असता ते समाधानी असल्याचे समजते तसेच त्यांच्या प्रत्येक वर्गात ५०० पुस्तकांचे ग्रंथालय असेल. त्याचप्रमाणे एम्.एस्.सी. पार्ट वन चा निकाल लागलेला आहे. सी.एच. एम. कॉलेजच्या प्राचार्यांशी चर्चा करण्यात येईल. मराठी मध्ये पीएच.डी. करणा-या विद्यार्थ्यांना प्रस्ताव देताना इंग्रजी भाषेत प्रत देण्याची गरज नाही. क्रीडा विभागात चाललेल्या गोंधळाबाबत जातीने लक्ष घालण्यात येईल.

विद्यापीठाने प्राध्यापकांची १०५ पदे आणि उपकुलसचिवांची काही पदे भरलेली असून त्यापैकी मागासवर्गीयांचीही पदे भरण्यात आली आहेत. खुल्या प्रवर्गात देखील मागासवर्गीय उमेदवाराना त्यांच्या गुणवत्तेनुसार प्राधान्य देण्यात आले आहे.

विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया प्रवेश समितीच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या रेमिडीयल कोचिंग, बुक बॅंक स्किम आणि कुलगुरू फंड या स्कीम बाबतचा अहवाल आपल्याला पुरविण्यात आलेला असून याबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयांची शहानिशा करण्यासाठी सदर विभागाकडे विचारणा केलेली आहे असे मा. प्र-कुलगुरूंनी स्पष्ट केले.

विद्यापीठातील मागासवर्गीय प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेत आरक्षणांची जी पदे आहेत ती इमाने इतबारे व योग्यरित्या भरण्यात आलेली आहेत व मागासवर्गीयांवर अन्याय झालेला नाही अशी माहिती डॉ. प्रल्हाद जोगदंड यांनी दिली.

विद्यापीठाच्या विभागातील आरक्षणांच्या दृष्टीने नेमण्यात आलेल्या समितीने चांगली कामगिरी केल्याबद्ल डॉ. अभय बांबोले यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले.

दीक्षांत सभागृह वातानुकुलित करण्याबाबत मागील सभेत झालेल्या चर्चेची आठवण करून देत सभागृह वातानुकुलित करून घ्यावे तसेच गणपतीसाठी दोन दिवस सुट्टी देण्यात यावी अशी सूचना डॉ. विजय पवार यांनी केली.

सर्व सन्माननीय अधिसभा सदस्यांचे सामूहिक छायाचित्र काढल्याबद्दल श्री. गणेश चव्हाण यांनी प्रशासनाचे आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे अधिसभेचे कार्य अधिक परिणामकारक आणि फलदायी व्हावे यासाठी सदस्यांची कार्यशाळा घेण्यात यावी. अशी सूचना केली.

डॉ. विष्णू मगरे यांची विद्यापीठाचे प्रथम लायझनिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती झाल्याची माहिती प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी सभागृहाला दिली.

स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीचा मुद्दा श्री. सुधाकर तांबोळी यांनी उपस्थित करून निवडणूका लवकरात लवकर घ्याव्यात अशी सूचना केली.

दिनांक २७ ऑक्टोबर, २०१३ रोजी श्री संजय वैराळ यांच्या सोबत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने उपस्थित होणा–या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठक बोलविण्यात येईल, असे मा. प्र–कुलगुरूंनी सांगितले.

**माननीय प्र–कुलगुरूंच्या विनंती नंतर श्री. दिलीप करंडे व श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.**

त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेतील बाब क्र.२ नुसार महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी बृहत आराखडा सभेपुढे विचारार्थ सादर केला.

बृहत आराखडा तयार करताना महाराष्ट्र विद्यापीठ कायदयाचे कलम ४ (७), कलम ८१ (१) चा, तसेच प्रवेश क्षमतेचा, समाजाच्या अपेक्षा व गरजांचा; दर्जा व गुणवत्तेचा, जागतिक स्पर्धेचा व जीवनाकरिता अनुरूप शिक्षण या मुद्यांचा विचार व्हावा तसेच आराखडा बनविताना विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, उद्योजक आदी संबंधितांची जिल्हानिहाय सभा घेवून मते जाणून घ्यावी अशी सूचना बृहत आराखडयावर चर्चा सुरू करताना प्रा. अंबादास मोहिते यांनी केली.

बृहत आराखडा जिल्हे, विभाग तसेच विधी महाविद्यालयातील विद्यार्थी नोंदणी संदर्भातील आकडेवारी आदि माहिती बरोबर नसल्याचा आक्षेप सन्माननीय सदस्य श्री महादेव जगताप यांनी नोंदविला व बृहत आराखडा तयार करताना डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, फॉर्मसी आदी संस्थांचा आराखडा/सूचनांचा विचार केला जावा असे मत व्यक्त केले.

आभासी वर्ग खोली (व्हर्चुअल क्लास रूम) सुरू केल्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करून सन्माननीय सदस्य प्राचार्य मुरलीधर चांदेकरांनी, टिचींग, रिसर्च, एक्स्टेंशन व कम्युनिटी सर्व्हिस या चार महत्वाच्या मुद्यांचा तसेच विद्यापीठ कायदा, प्रशासनाचे विकेंन्द्रीकरण या बाबींचा विचार सुध्दा बृहत आराखडा बनवितांना केला जावा अशी

अपेक्षा व्यक्त केली. तर दीर्घकाळ चालतील असे कोर्सेस सुरू करण्याची सूचना सन्माननीय सदस्य डॉ. दिपक बीडवई यांनी केली.

शैक्षणिक दर्जा टिकविण्याकरिता विद्यापीठाचे जे काही नियम आहेत त्यांची अंमलबजावणी केली जावी असा उल्लेख बृहत आराखडयात असण्याची गरज सन्माननीय सदस्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी प्रतिपादीत केली.

बृहत आराखडयाच्या अनुषंगाने दिलेल्या आकडेवारीमध्ये ज्या चुका आहेत त्या दुरूस्त कराव्यात व आराखडयात नावीन्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण अभ्यासक्रम नेमके कोणते असावेत तसेच महिला महाविद्यालय, रात्र महाविद्यालय, कल्याण उपकेंद्रातील स्कूल ऑफ इंजिनियरींग, ठाणे जिल्हयातील मागासवर्गीय/आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाचा अंतर्भाव असावा अशी अपेक्षा सन्माननीय सदस्य डॉ. विवेक देशमुख यांनी व्यक्त केली.

कम्युनिटी कॉलेजेसचे प्रस्ताव तालुका निहाय, मेट्रोपोलिटन एरिया निहाय सादर केले जावेत तसेच नावीण्यपूर्ण अभ्यासक्रमांची यादी शैक्षणिक संस्थाना प्रस्ताव सादर करण्यासाठी दिली जावी. अशी सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य डॉ. मुरलीधर कु-हाडे यांनी केली.

विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास, महिला व रात्र महाविद्यालय या मुद्यांची बृहत आराखडयात विशेष काळजी घेतली जावी अशी भावना सन्माननीय सदस्या प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम् यांनी व्यक्त केली. बृहत आराखडा चांगल्या प्रकारे बनविल्याबद्ल समितीचे अभिनंदन करून सन्माननीय सदस्य प्राचार्य श्री विठ्ठल रोकडे यांनी अध्यापन, अध्ययन, मुल्यांकन, विस्तार सेवा, संशोधन, सांस्कृतिक कार्य व क्रीडा आदि सर्वच बाबतीत आपले विद्यापीठ आघाडीवर असल्याचे नमूद करून गुणवत्ता वाढीकरिता महाविद्यालयांना व विद्यापीठ विभागांना अधिक सक्षम करण्यावर भर द्यावा तसेच महिला व रात्र महाविद्यालय सुरू करण्याकरिता बृहत आराखडयात अटी नसाव्यात असे सूचविले.

महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ तसेच बृहत आराखडा समितीने विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थी संख्येची आकडेवारी देवून परंपरागत अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत हे मिथ्यक/धारणा रदद् करण्यास मदत केली याबद्ल त्यांचे अभिनंदन करून सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी महिला महाविद्यालय व रात्र महाविद्यालयांची आवश्यकता प्रतिपादीत केली.

बृहत आराखडा समितीच्या सदस्या डॉ. तपती मुखोपाध्याय यांची युजीसी फेलोशिप करिता निवड झाल्याबद्ल त्यांच्या तसेच त्यांना हे कार्य आपल्या संस्थेतर्फे करण्याची संधी दिल्याबद्ल गोगटे वाळके महाविद्यालय, बांदा यांच्या अभिनंदनाचा डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी मांडलेला व प्राचार्य विठ्ठल रोकडे यांनी अनुमोदित केलेला ठराव मान्य करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी बृहत आराखडयात संशोधन बाबत नियोजन असावे, कम्युनिटी कॉलेजेस बाबत तालुका निहाय आकडेवारी देण्यात यावी अशी सूचना करून चर्चेदरम्यान कम्युनिटी कॉलेजेसना कायम स्वरूपी प्राचार्य मिळतील का? या महाविद्यालयांच्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचा-यांना पूर्ण पगार मिळेल का? या शंका उपस्थित केल्या.

बृहत आराखडया संदर्भातील चर्चेत सहभागी झालेल्या सन्माननीय सदस्यांनी ज्या चांगल्या सूचना केल्या आहेत त्यांचा यापुढे बृहत आराखडा तयार करताना अवश्य विचार केला जाईल असे आश्वासन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी दिले व बृहत आराखडा मान्य केल्याबद्दल सभागृहाचे आभार मानले.

विद्यापीठामध्ये सर्वात उच्च पदस्थ असलेल्या आदरणीय कुलपतींचा आज वाढदिवस आहे, सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत व आजच्या दिवशी सर्वांनी अधिसभेत विविध महत्वाच्या मुद्यांवर चर्चा करून काही चांगल्या सूचना केल्या आहेत

त्याबद्दल व प्रशासनास देत असलेल्या सहकार्याबद्दल मा. कुलगुरूंनी उपस्थित सर्व सन्माननीय अधिसभा सदस्यांचे आभार मानले. अधिसभा सदस्य ज्या भावना मांडतात तशाच भावना प्रशासनाच्या व विद्यापीठ अधिकारी, कर्मचा-यांच्या सुध्दा आहेत. विद्यापीठ व्यवस्थापनाच्या दृष्टीने किती मोठे असावे याबाबत देशभरात अनेक मोठ-मोठया समित्यांमध्ये चर्चा झालेली आहे. विद्यापीठ प्रशासनाला ज्या ज्या गोष्टी करता येणे शक्य आहे त्या सर्व गोष्टी केल्या जातील व ज्या गोष्टी आपण सर्वांनी मिळून करण्याची गरज आहे त्या गोष्टीच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले. तसेच डी. लिट. देण्यासंदर्भात सभागृहापुढे मांडण्यात आलेली सूचना, मार्गदर्शक तत्वांचे पालन करून मा. राज्यपालांकडे पाठविण्यात येतील व त्यांच्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल अशी ग्वाही देत मा. राज्यपालांकडून जो पर्यंत निर्देश येत नाहीत तो पर्यंत याबाबत बाहेर चर्चा व वाच्यता करणे योग्य ठरणार नाही असे मत मा. कुलगुरूंनी व्यक्त केले. सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे व सहकार्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई - ४०० ०३२<br>
२६ फेब्रुवारी, २०१४

कुलसचिव<br>
मुंबई विद्यापीठ